संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

क्र.संगाबाअवि-३/संपमूमं/१६३/२०२१

दिनांक: ०३ जुन २०२१

प्रति,

प्राचार्य /विभाग प्रमुख / मानद संचालक,
सर्व संबंधीत महाविद्यालये /
विद्यापीठ शैक्षणिक विभाग /
मॉडेल डिग्री कॉलेज
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**विषय : हिवाळी २०२० विद्यापीठ परीक्षांबाबत सुचना.**

महोदय,

कोविड - १९ ची सद्यस्थिती व त्या अनुषंगाने Brake the Chain अंतर्गत असलेले निर्बंध विचारात घेउन शासनाकडुन प्राप्त निर्देशांनुसार विद्यापीठाच्या हिवाळी २०२० विषम सत्राच्या परीक्षा Online पध्दतीने दिनांक ०८ जुन २०२१ पासुन निदेश क्रमांक ०५/२०२१ मधील Offline परीक्षा हा शब्द वगळुन घ्यावयाच्या आहेत.

विद्यापीठाद्वारे सदर परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले असुन जाहीर वेळापत्रकानुसार व हिवाळी - २०२० परीक्षा संचालनाकरिता प्रसिध्द करण्यात आलेल्या निदेश क्रमांक ०५/२०२१ मधील कार्यपध्दतीनुसार सदर परीक्षांचे संचालन महाविद्यालयांना करावयाचे आहे.

जाहीर वेळापत्रकानुसार प्रत्येक दिवसाचे परीक्षेच्या ०१ दिवस आधी प्राचार्यांचे अधिकृत ई-मेल वर Questioin Paper व Answer key पाठविण्यात येईल. त्यानुसार महाविद्यालयांनी परीक्षांचे संचालन Online पध्दतीने करावयाचे आहे. निदेश क्रमांक ०५/२०२१ मध्ये नमूद केल्यानुसार सोडविलेल्या Online उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन महाविद्यालय स्तरावरच करून प्रचलित पध्दतीनुसार विद्यापीठामनध्ये गुण सादर करावयाचे आहेत. त्याआधारे सदर विद्यार्थ्यांचे परीक्षा निकाल जाहीर करण्यात येतील.

जाहीर वेळापत्रकांनुसार घ्यावयाच्या परीक्षांच्या रोल लिस्ट, प्रवेशपत्रे तयार करण्यात आली आहेत.व महाविद्यालयांना Online उपलब्ध करून देण्यात आली असुन Hard Copy पाठविण्याची कार्यवाही सुरूआहे.. त्यानंतरही विहीत मुदतीत परीक्षा आवेदनपत्र व शुल्क भरूनही जर काही विद्यार्थ्यांचे रोल लिस्ट मध्ये नाव समाविष्ट झाले नसेल अशा विद्यार्थ्यांनी विहीत मुदतीत परीक्षा आवेदनपत्र भरले असल्याची खात्री महाविद्यालयांनी त्यांचे स्तरावर करून सदर विद्यार्थ्यांना महाविद्यालय स्तरावर परीक्षा क्रमांक वितरित करावेत. परीक्षा क्रमांक वितरित करतांना प्रत्येक परीक्षेकरिता प्रथम ९ हा क्रमांक देउन त्यानंतर महाविद्यालय सांकेतांक व त्यानंतर अनुक्रमांक देण्यात यावा. (उदा. भारतीय महाविद्यालय, अमरावती (११०) येथील विद्यार्थ्यास बी.ए सत्र ०३ करिता परीक्षा क्रमांक द्यावयाचा असल्यास ९ ११० १, ९ ११० २ असे परीक्षा क्रमांक द्यावेत. तसेच भारतीय महाविद्यालय, अमरावती (११०) येथील विद्यार्थ्यास बी.एससी सत्र ०३ करिता परीक्षा क्रमांक द्यावयाचा असल्यास ९ ११० १, ९ ११० २ असे परीक्षा क्रमांक द्यावेत.) इतर परीक्षांकरिता सुध्दा याप्रमाणेच परीक्षा क्रमांक द्यावेत.

अशा प्रकारे महाविद्यालय स्तरावर परीक्षा क्रमांक दिलेल्या विद्यार्थ्यांचे विहीत मुदतीत परीक्षा आवेदनपत्र भरल्याचे संपूर्ण दस्तऐवज विद्यापीठाद्वारे देण्यात येणाऱ्या तारखेस विद्यापीठामध्ये तपासणी करिता महाविद्यालयांनी आणावे. सदर दस्तऐवजांची तपासणी करून परीक्षा आवेदनपत्र विहीत मुदतीत भरल्याची खात्री झाल्यावरच अशा विद्यार्थ्यांचे परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात येतील. अन्यथा सदर निकाल जाहीर करता येणार नाहीत.

उपरोक्त सुचना व जाहीर वेळापत्रकानुसार परीक्षांचे संचालन करून विद्यापीठास परीक्षा कार्यात सहकार्य्. करावे, ही विनंती.

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

प्रत माहिकीकरिता-

१) प्रमुख, संगणक केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
पत्र विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यास्तव.

२) जनसंपर्क अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

३) सहाय्यक कुलसचिव (परीक्षा/चौकशी, परीक्षा, सारणी)

४) सहाय्यक कुलसचिव (गोपनीय)